# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.२५/०२/२०२२

आरोपी लोकसेवक १) अमोल रामदास कोकाटे वय-५५ वर्ष, व्यवसाय- नोकरी कनिष्ठ सहायक आरोग्य विभाग जि.प.वाशिम रा. ध्रुव चौक,शुक्रवार पेठ वाशिम. यांना ४०,०००/- रुपयेची लाच स्विकारले प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | १) अमोल रामदास कोकाटे वय-५५ वर्ष, व्यवसाय - नोकरी कनिष्ठ सहायक आरोग्य विभाग जि.प.वाशिम रा. ध्रुव चौक,शुक्रवार पेठ वाशिम. |
| लाच मागणी रक्कम | तक्रार - ५५,०००/-रुपये<br>तडजोडीअंती - ४०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे प्रलंबित असलेले ४ महिण्यांचे थकित वेतन काढुन देण्याकरीता आलोसे यांनी तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | एस.यु.कांबळे,पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांचे प्रलंबित असलेले ४ महिण्यांचे थकित वेतन काढुन देण्याकरीता आलोसे अमोल रामदास कोकाटे, कनिष्ठ सहायक आरोग्य विभाग जि.प.वाशिम यांनी तक्रारदार यांना रु. ५५,०००/- लाचेची मागणी केल्याची तक्रारदार यांनी दिनांक २४.०२.२०२२ रोजी तक्रार दिली.

सदर तक्रारी वरुन दि. २४/०२/२०२२ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक अमोल रामदास कोकाटे यांनी प्रलंबित असलेले ४ महिण्यांचे थकित वेतन काढुन देण्याकरीता करीता तक्रारदार यांना ५५०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दि. २५/०२/२०२२ रोजी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले असता आरोपी अमोल कोकाटे यांनी तक्रारदार यांच्या कडून लाच रक्कम ४०,०००/- रुपये(२०,०००/- रुपये रक्कमेच्या चलनी नोटा व २०,०००/- रुपये रक्कमेचे कागदी तुकडे) स्विकारल्याने आरोपी लोकसेवक यांना रंगेहाथ पकडयान आले असुन त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन वाशिम शहर जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विशाल वि. गायकवाड, अपर पोलीस अधिक्षक अरुण सावंत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पोलीस उपअधिक्षक गजानन आर शेळके, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक एस.यु.कांबळे व अंमलदार पोहवा. अरविंद राठोड,दुर्गादास जाधव, पोना. विनोद अवगळे, रविंद्र घरत, राहुल व्यवहारे, योगेश खोटे ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन एस.यु.कांबळे, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
एस.यु.कांबळे - ९९२२२४३४३८

( एस.यु.कांबळे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.

Scanned by TapScanner